| | |
|---|---|
| MHPU240000062021 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १/२०२१**<br><br>प्रणाली भालेराव<br>**विरुध्द**<br>संदेश भालेराव |

**फौ.कि.अर्ज क्र.१/२०२१ मधील निशाणी ५ वरील आदेश**

(दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजी पारित केले)

**१)** सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या तरतूदी नुसार अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२)** अर्जदाराने मूळ अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे व त्यामध्ये कलम १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे आदेशांची मागणी केली आहे.

**३)** सदरच्या अर्जात अर्जदाराचे कथन आहे की, तिचा विवाह जाबदेणार क्र. १ याच्यासोबत १७.१२.२०१८ रोजी झाला असुन त्यांचेतील विवाहसंबंध अद्याप कायम आहे. तसेच अर्जदारास सदर लग्नसंबंधातून काहीएक आपत्य झालेले नाही. सदर लग्नासाठी अर्जदार हिचे वडिलांनी सुमारे साडे सहा ते सात लाख रुपये खर्च केला आहे. अर्जदार हिच्या वडिलांनी अर्जदार हिला साडे तीन तोळे वजनाचा राणीहार व अर्धा तोळे वजनाचे कानातील झुमके, जाबदेणार क्र. १ यास अर्धा तोळे वजनाचे सोन्याची अंगठी व एक तोळे वजनाची सोन्याची चैन घातली होती. लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांचे कडे कळंब येथे नांदायला गेली. त्यावेळी तेथे जाबदेणार क्र. १ याचे वडिल जाबदेणार क्र. २, जाबदेणार क्र. १ ची आई जाबदेणार क्र. ३ व जाबदेणार क्र. १ ची बहिण जाबदेणार क्र. ४ असे सर्व जण एकत्र राहण्यास होते. लग्नाचे वेळी अर्जदार हौसिंग फायनान्स लि. पुणे येथे तात्पुरत्या नोकरीस होते. परंतु लग्नावेळी जाबदेणार याने अर्जदार हिस मुंबई येथे घराजवळच नोकरी करावी लागेल, आम्ही तुझेसाठी नोकरी शोधून देवू, अशी अट घातली होती. कळंब येथे १५ दिवस

राहिल्यानंतर अर्जदार ही जाबदेणार यांचे सोबत भांडूप येथे राहण्यास गेली. त्या ठिकाणी जाबदेणार क्र. ४ ही तिचा संसार सोडून राहण्यास होती. जाबदेणार क्र. १ ते ३ हे सुरुवातीचे एक महिना अर्जदार हिच्याशी व्यवस्थित वागले पण त्यानंतर ते तिला त्रास देवू लागले, शिवीगाळ करु लागले, अर्जदार हिला टोचून बोलणे, घाणेरडया शिव्या देणे, किरकोळ कारणावरुन शिवीगाळ करणे, तिच्या आईवडिलांबद्द्ल अनुद्‌गार काढून मानसिक व शारिरीक त्रास देण्यास सुरुवात केली.

**४)** पुढे अर्जदार हिच्या कथनानुसार, जाबदेणार क्र. ३ ही अर्जदार हिला तुला स्वयंपाक नीट येत नाही, तुला तुझे आईने नुसतेस खायला शिकविले असे म्हणून वारंवार अपमानीत करत. तसेच अर्जदार हिने केलेला स्वयंपाक जाबदेणार क्र. ३ हिला आवडत नसे. परंतु आपण नवीन आहोत, सर्वांच्या वागण्यात फरक पडेल असा विचार करुन अर्जदार ही शांतपणे संसार करत होती. जाबदेणार क्र. २ हे देखील जाबदेणार क्र. ३ हिला अर्जदाराचे विरुध्द बोलण्यास प्रवृत्त करत असे. याबाबत अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ यास सांगितले असता, जाबदेणार याने अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण केली. जाबेदणार क्र. २ ते ४ हे अर्जदार हिला माहेरहून हुंडा आणला नाही, सरकारी नोकरीसाठी आईवडिलांकडून चार लाख रुपये घेवून ये, तरच तुला नांदवितो असे बोलून तिचा छळ करु लागले. जाबदेणार क्र. १ यास सदर प्रकाराबाबत सांगितले असता, त्याने देखील अर्जदार हिला माहेरहून पैसे घेवून येण्याबाबत सांगितले. अर्जदार हिची माहेरची परिस्थिती गरिबीची असल्याने ते पैसे देवू शकत नाही, असे अर्जदार हिने सांगितल्यानंतर जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार हिला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली.

**५)** पुढे अर्जदार हिच्या कथनानुसार, जाबदेणार क्र. १ ते ४ हे अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास देत असल्याने तिने त्याबाबत तिचे माहेरी फोनकरुन सांगितले. त्यावेळी तिचे आईवडिल व मध्यस्थी अर्जदार हिचे सासरी आले असता, जाबदेणार क्र. १ चे चुलते नामदेव भालेराव यांनी तुमची मुलगी नालायक आहे, तिची आमच्याकडे नांदायची पात्रता नाही, असे म्हणाले. त्यावेळी

जाबदेणार क्र. १ ते ४ हे अर्जदार व तिच्या आईवडिलांना शिव्या देवू लागले व अर्जदार हिच्या आईवडिलांना मारहाण करु लागले. त्यावेळी अर्जदार ही त्यांना सोडविण्यासाठी गेली असता, त्यांनी तिच्या अंगावरील सर्व दागिने काढून घेतले. त्यामुळे घाबरुन अर्जदार व तिचे आईवडिल महाळुंगे पडवळ येथे निघून आले. त्यानंतर अनेक वेळा मध्यस्थांमार्फत अर्जदार हिला नांदविण्यासाठी बैठक घेतली असता, प्रत्येक बैठकीमध्ये जाबदेणार यांनी घटस्फोटाची मागणी केली.

**६)** पुढे अर्जदार हिच्या कथनानुसार, दि. २६.०७.२०१९ रोजी अर्जदार तिचे शैक्षणिक कागदपत्रे, दागदागिने, दैनंदिन वापराची कपडे आणण्यासाठी सासरी गेली असता, जाबदेणार यांनी तिला हुसकावून लावले. त्यावेळी अर्जदार ही भांडुप पश्चिम येथील पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेली असता, पोलिसांनी जाबदेणार यांना बोलावून घेतले व त्यांना समज दिल्यानंतर तिचे शैक्षणिक कागदपत्रे व दैनंदिन वापराची कपडे त्यांनी पोलिस ठाण्यात आणून दिली व दागिने आम्ही तुला देणार नाही असे सांगितले. तसेच दि. २०.०१.२०२० रोजी अर्जदार हिने महिला सहायता विभाग पुणे यांचेकडे जाबदेणार यांचेविरुध्द तक्रार केली असता, जाबदेणार यांनी सदर ठिकाणी येवून घटस्फोटाची मागणी केली. दि. ०९.०३.२०२० रोजी अर्जदार हिने जाबदेणार यांचेविरुध्द शारिरीक व मानसिक छळ करुन त्रास दिल्याबाबत मंचर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. अर्जदार ही तिचे आईवडिलांकडे गेल्या दीड वर्षापासून राहत आहे. जाबदेणार यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरीक छळ करुन तिचे जगणे असहय केल्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केला आहे. तसेच अर्जदार हिला उपजिवीकेचे साधन नाही. जाबदेणार क्र. १ हा जगवार कंपनी अंधेरी येथे नोकरीस असून त्याला दरमहा ४०,०००/— इतके वेतन आहे. तसेच जाबदेणार क्र. २ हे मुंबई येथे अकाउंटंट असून त्यांना दरमहा रु.३०,०००/— इतके वेतन आहे. तसेच जाबदेणार क्र. ३ ही कोलगेट कंपनी पवई येथे सॉप्टवेअर इंजिनीअर असून तिला दरमहा रु. ३०,०००/— इतके वेतन आहे. तसेच जाबदेणार यांची कळंब येथे १५ एकर बागायती शेतजमीन असून त्यांना ५ ते ६ लाख रुपये उत्पन्न मिळते. जाबदेणार याचे कळंब येथे कपडयाचे दुकान

असून त्यापासून त्यांना एक ते दीड लाख रुपये उत्पन्न मिळते. अशाप्रकारे जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून अर्जदारास दरमहा रु. २५,०००/— पोटगी देण्याची ऐपत आहे. त्यामुळे अर्जदार हिने मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत तिला अन्नवस्त्र यासाठी दरमहा रु.२५,०००/— इतकी अंतरिम पोटगी दयावी, तसेच भाडयाने स्वतंत्र सदनिका अथवा त्यासाठी दरमहा रु. ५,०००/— इतके घरभाडे जाबदेणार यांचेकडून मिळावे अशी मागणी केली आहे.

**७)** जाबदेणार यांनी निशाणी क्र. २० प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी नातेसंबंध मान्य करुन इतर मजकुर नाकारलेला आहे. जाबदेणार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार ही जाबदेणार यांचेसोबत राहत असतांना तिचे वागणे विचीत्र होते. अर्जदार ही जाबेदणार क्र. १ व त्याचे कुटूंबामध्ये गैरसमज निर्माण करत असे व एकमेकांविरुध्द खोटयानाटया गोष्टी सांगत असे. अर्जदार हिच्या अशा वागण्यामुळे जाबदेणार व त्यांचे कुटुंबियांना खुप सहन करावे लागले असल्यामुळे व एकत्र राहिल्यानंतर जाबदेणार यांच्या मानसिक व शारिरीक आरोग्यास अपरिमित हानी होणार आहे त्यामुळे जाबदेणार क्र. १ याची अर्जदार हिचे सोबत संसार करण्याची इच्छा नाही.

**८)** पुढे जाबदेणार याचे म्हणण्यानुसार, अर्जदार हिने स्वतःहून तिच्या आईवडिलांच्या सल्ल्याने जाबदेणार यांचे घर सोडून दिल्याने अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही. अर्जदार हिने जाबदेणार यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. अर्जदार हिने जाबदेणार यांचे पासून महत्वाच्या गोष्टी लपवून ठेवलेल्या आहेत. जाबदेणार यांचे अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची जबाबदारी नाही. अर्जदार व तिचे वडिलांनी अर्जदार ही मानसिकदृष्टया सक्षम नसल्याचे जाबदेणार यांचेपासून लपवून ठेवून जाबदेणार यांना अर्जदार हिच्याशी लग्न करण्यास भाग पाडले. जाबदेणार क्र. १ याचे पदवीपर्यंत शिक्षण पुर्ण झालेले नसल्याने त्याला कोणतीही नोकरी मिळत नसल्याने तो त्याच्या वडिलांच्या व्यवसायात एजंट म्हणून काम करत असल्याने त्याला रु.

९,०००/— इतके मासिक उत्पन्न आहे. जाबदेणार क्र. १ यास त्याच्या वडिलांवर अवलंबून राहावे लागत आहे. अर्जदार व तिच्या कुटूंबाने जाबदेणार यांची फसवणूक करुन जाबदेणार क्र. १ याचे आयुष्य उध्दवस्त केल्यामुळे तो मानसिक तणावात आहे. अर्जदार हिने जाबदेणार याला त्रास देण्यासाठी व पैसे लुबाडण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हिने महिलांचे कौटूंबिक संरक्षण कायदयाचा दुरपयोग करुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**९)** अर्जदार व जाबदेणार यांचेतर्फे त्यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार जाबदेणार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | : | होकारार्थी |
| २. | अर्जदार जाबदेणार क्र. १ याचेकडून अर्थिक सहाय्य मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती? | : | अंशत: होकारार्थी. अर्जदार हीस दरमहा रक्कम रू.३,०००/— मात्र |
| ३. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशानुसार |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ करीता :—</u>**

(पुनरावृत्ती टाळण्याचे उद्देशाने याठिकाणी मुद्दे क्र. १ ते ३ एकत्रित विचाराधीन घेतलेले आहेत.)

**१०)** अर्जदाराने अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. त्यावरून असे दिसते की, अर्जदाराने सदरच्या अर्जाव्दारे केलेल्या मागण्या

व मूळ अर्जातील मागण्या सारख्या आहेत. हे खरे आहे की, घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम १३ प्रमाणे अंतरिम आदेश करता येतो. परंतु याबाबत जरी जाबदेणार याने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे नाकारलेले असले तरी त्यादृष्टीने याबाबत अभिलेखावर संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेल्या कौटूंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. तसेच जाबदेणार याने अर्जदार ही स्वत:हून माहेरी राहत असल्याचे कथन केलेले असले तरी अर्जदाराने स्वत: जाबदेणार यांचा त्याग केला किंवा कसे ही बाब दोन्ही बाजूचा पुरावा घेवून गुणवत्तेवर ठरविणे आवश्यक आहे. परंतु सकृतदर्शनी अर्जदार ही जाबदेणार पासून स्वतंत्र रहात असून जाबदेणार ने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत आर्थिक लाभाचा आदेश करणे उचित होईल. आर्थिक लाभाचा आदेश पोटगीच्या स्वरुपात करता येईल. अर्जदार व जाबदेणार क्र. १ एकत्र रहात नाहीत. अर्जदार तिच्या माहेरी रहात आहे. अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचा विवाहसंबंध अद्याप कायम आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अर्जदारांचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी जाबदेणार क्र.१ याची आहे. परंतु अर्जदाराने जाबदेणार यांचेविरुध्द केलेले आरोप, तसेच अर्जदार ही माहेरी राहत असतांना तिच्या उदरनिर्वाहाकरीता जाबदेणार यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही हे पाहता, जाबदेणार यांनी निश्चितच अर्जदाराची जबाबदारी टाळल्याचे दिसून येते.

**११)** तसेच जाबदेणार क्र.१ याने त्याला वडिलोपार्जीत शेती असल्याचे नाकारलेले नाही. तसेच जाबदेणार क्र. १ याने दाखल केलेल्या मालमत्ता आणि जबाबदारी चे प्रतिज्ञापत्रामध्ये त्यास मे. संदेश ट्रेडर्स येथे नोकरीस असल्याचे व रक्कम रु. १०,०००/— इतके वेतन दरमहा मिळत असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्याचेवर कोणाचेही देणे अथवा कर्ज असल्याचे दिसून येत नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या मालमत्ता आणि जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रात तिने तिचे शिक्षण एमए.बीएड असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु जाबदेणार याने त्याचे

मालमत्ता आणि जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रात अर्जदार ही एलआयसी मध्ये काम करत असल्याने तिला रु.२५,०००/— उत्पन्न असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु जाबदेणार याने त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. याउलट, जाबदेणार क्र. १ याने दाखल केलेल्या मालमत्ता आणि जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रात त्याचे शिक्षण पदवीपर्यंत झाले असल्याचे नमुद करुन त्याला रक्कम रु.१०,०००/— दरमहा वेतन मिळत असल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत जाबदेणार क्र.१ यास उत्पन्नाचे साधन नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत, अर्जदाराच्या दैनंदिन गरजा, तसेच राहणीमान पहाता, जाबदेणार क्र.१ याने अर्जदारास दरमहा रुपये ३,०००/— या दराने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. अर्जदारा हिने तिला जाबदेणार याचेकडून राहण्यासाठी भाडयाने स्वतंत्र सदनिका अथवा घरभाडे रु. ५,०००/— ची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत असल्याने सदर मागणीबाबत दोन्ही बाजूंचा पुरावा घेवून गुणदोषांवर आदेश केल्यास दोन्ही बाजूंना न्याय्य होईल व ऐकण्याची संधी मिळेल. यावरुन अर्जदाराचा अर्ज अंशत : मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्या क्र. ३ करीता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज निशाणी ५ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास दरमहा रक्कम रू. ३,०००/— (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) या दराने अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत नियमितपणे दयावी.

३. आदेशाची प्रत सरंक्षण अधिकारी, अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांना विनामूल्य देण्यात यावी.

४. आदेश खुल्या न्यायदान कक्षात सांगितला व अधिघोषित केला.

दिनांक – ०५/१०/२०२३ (एम. एस. माळी)
घोडेगाव जि पुणे. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, घोडेगाव

## शेरा

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | एम. एस. माळी<br>सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव |
| लघुलेखकाचे नाव | : | ए. के. मते |
| निकाल तारीख | : | ०५/१०/२०२३ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०५/१०/२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०६/१०/२०२३ |